नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 04/10/2023 (बुधवार) सकाळ

## जबरी संभोग करून जिवानीशी ठार करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. काटोल :— दिनांक ०६/१०/२०२१ चे १६/३२ वा. दरम्यान फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे अप. २१६/२०२१ कलम ३०२, ३५४, ३५४(ब), ३७६ भादंवि कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक ०२/१०/२०२१ चे १६/०० वा. ते १६/३० वा. दरम्यान यातील **आरोपी नामे— अमलेशकुमार शंभु मंडल, वय १८ वर्ष, रा. गडीराधे नगर जि. सुफाल बिहार ह. मु. सावरगाव रोड काटोल** याने मृतक सोबत बलात्कार करण्याच्या उद्देशाने मृतक हीच्या झोपडीवर पाळत ठेवुन नंतर झोपडीमध्ये प्रवेश करुन मृतक हीच्यावर बलात्कार करण्याचा प्रयत्न केला. मृतक हिने आरोपीस विरोध केला असता यातील आरोपीने बळाचा वापर करुन मृतकावर बलात्कार करण्याचा प्रयत्न केला दरम्यान मृतक ही झोपडीचे बाहेर स्वत:चा जिव वाचविण्याकरीता झोपडीतुन पळत आली असता यातील आरोपी हा तिचे मागे आला व नमुद मृतक ही धावत असतांना जमिनीवर पडल्याने आरोपीने मृतक हिचे पाय पकडुन निर्दयीपणे जमिणीवरुन ओढत, घासत झोपडीच्या आतमध्ये नेवुन तिच्यावर बलात्कार करुन मृतक हीचा गळा दाबुन जिवानीशी ठार मारले.

सदर प्रकरणाचे तपास सहायक पोलीस निरीक्षक मनोज चौधरी यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. पी. डी. जे. अग्रवाल सो. कोर्टामध्ये सादर केले. दिनांक ०४/१०/२०२३ रोजी मा. मा. पी. डी. जे. अग्रवाल सो. यांनी वरील सदर गुन्हयातील आरोपीस कलम ३०२ भादंवि मध्ये आजीवन कारावास व १०,०००/— रु. दंड, दंड न भरल्यास ०२ वर्ष, सश्रम कारावास. तसेच कलम ३५४ भादंवि मध्ये ०५ वर्ष, सश्रम कारावास व ५०००/— रु. दंड. दंड न भरल्यास ०६ महीने सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने ए.पी.पी. खापर्डे मॅडम यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन पोशि/४०५ प्रमोद कोहळे पो.स्टे काटोल यांनी मदत केली आहे.

## घरफोडी

**पो.स्टे. कुही** :– अंतर्गत ३५ कि. मी. अंतरावरील मौजा चिकना येथे दिनांक ०३/१०/२०२३ ते दिनांक ०४/१०/२०२३ चे रात्री दरम्यान फिर्यादी नामे– निलीमा ओमप्रकाश आकरे, वय ३८ वर्ष, रा. चिकना जि. नागपुर ही दि. ०१/१०/२०२३ रोजी आपल्या मुलाबाळासह माहेरी मेटा उमरी येथे घराचे दाराला कुलुप लावुन गेली होती. फिर्यादीचे घरी कोणीही नव्हते. दिनांक ०४/१०/२०२३ रोजी सकाळी ०६.३० वा. दरम्यान फिर्यादीचे माहेरी मेटा उमरी येथे असतांना घराशेजारी राहणारे माला देशमुख यांनी फिर्यादीला फोन करून सांगीतले की, तुमचे घराचा दरवाजा उघडा आहे असे सांगीतल्यावरून फिर्यादी सकाळी अंदाजे ०७.३० वा. दरम्यान आपले घरी चिकणा येथे आली तर समोरील दार उघडे होते व हॉलजवळील दाराचे लोखंडी कब्जे तुटलेले व दार उघडे दिसले घराचे आत जावून पाहीले तर घराचे आत ठेवलेली लोखंडी आलमारीमधील सामान घरातील फरशीवर अस्ताव्यस्त पडलेले होते व लोखंडी आलमारीमध्ये ठेवलेली १) लहान मुलांची सोन्याची चैन १५ वर्ष जुनी, २) सोन्याची अंगठी १७ वर्ष जुनी, ३) सोन्याचे मोराची डिझाईन असलेली कानातील टॉप्स १० वर्ष जुनी, ४) सोन्याची एकुण ३ अंगठी लहान मुलांचे १५ वर्ष जुनी, ५) ५० नग सोन्याची मनी डोरले असलेले मंगळसूत्र १० वर्ष जुने ६) नाकातील सोन्याची नथ १७ वर्ष जुनी व ७) भिसीचे नगदी ३१,०००/–रु. असा एकून नगदी व सोन्याचे दागिनेसह ६१,०००/– रू. चा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कुही येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक हरिदास सोनकुसरे पोस्टे कुही मो.नं. ९०२१५४२९१८ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**